# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

वणी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४
Vani Road, Mhasrul, Nashik-422004

डॉ. आ.ना. सूर्यकर
पीएच.डी., एफएसीबीआय
कुलसचिव

Phone : 0253-2531837, EPABX:0253-2539100/300, Fax:0253-2539295
E-mail: registrar@muhsnashik.com / Web: www.muhsnashik.com
दुरध्वनी क्र.:(०२५३)२५३९१९३

जा.क्र.मआविवि/ई.३/१८/पदवी/ ५२७० महत्वाचे/तातडीचे दि. २०/१२/२०११

प्रति,
प्राचार्य / अधिष्ठाता,
सर्व संलग्नित आयुर्वेद महाविद्यालये,
मआविवि, नाशिक.

विषय :- सुधारित व्दितीय वर्ष बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम लागू करणेबाबत...

संदर्भ :- १) भा.चि.के.प. यांचे पत्र क्र. २८-१३/०९-आयु सिलॅबस दि. १६/१२/२००९
२) दि. १९/१२/२००९ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २७०/२००९
३) दि. १६/०२/२०१० रोजीच्या अभ्यासमंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ०२/२००९
४) दि.१७/०५/२०१० रोजी झालेल्या आयुर्वेद व युनानी विद्याशाखेच्या बैठकीतील ठराव क्र.१७/२०१० (ब)
५) दि. १९/०५/२०१० रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ४२५/२०१०
६) विद्यापीठाचे पत्र क्र. मआविवि/इ.३/१८/पदवी/२४४४ दि. ०२/०८/२०१०

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने दि.१९/०५/२०१० रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४२५/२०१० च्या अनुषंगाने आपणास यापूर्वी विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/इ.३/१८/पदवी/२४४४ दि.०२/०८/२०१० अन्वये सुधारित बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम शै. व. २०१०-११ पासुन प्रवेशित तुकडीपासुन लागू केल्याबाबत आपणास कळविलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासुन प्रथम वर्षासाठी प्रवेशित विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये व्दितीय वर्षात प्रवेशीत होत असल्याने त्यांना व्दितीय वर्षाचा बीएएमएस अभ्यासक्रम लागु करणे आवश्यक होते. यास्तव, विद्यापरिषदेच्या उपरोक्त ठरावानुसार व्दितीय वर्षाचा बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम खाली नमूद केल्याप्रमाणे लागू करण्यात येत आहे (सदर व्दितीय वर्षाचा अभ्यासक्रमाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे).

सदरचा व्दितीय वर्षाचा बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१०-११ अंतर्गत प्रथम बी.ए.एम.एस. वर्षात प्रवेश घेऊन विद्यापीठाची- ऑक्टो/ नोव्हे. २०११, प्रथम बी.ए.एम.एस. परिक्षा उत्तीर्ण केली व व्दितीय वर्ष बी.ए.एम.एस. वर्षात प्रवेश घेतला या विद्यार्थी तुकडीपासुन लागु राहील याची नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे उपरोक्त व्दितीय वर्ष बी.ए.एम.एस अभ्यासक्रम लागू होतांना अतंर्गत मुल्यांकन/चाचणीबाबत परिक्षाविभागामार्फत स्वतंत्ररित्या अधिसुचनेव्दारे कळविण्यात येईल. तसेच यापुर्वीच्या शै. वर्षामध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठाने यापुर्वी कळविल्याप्रमाणेच (जुना व सुधारीत) तो-तो अभ्यासक्रम लागु राहील, याची नोंद घ्यावी.

सदर बाबत महाविद्यालय स्तरावर त्वरीत यथायोग्य कार्यवाही करण्यात यावी व सर्व संबंधितांना उपरोक्त बाब अवगत करण्यास्तव सदर पत्रास सुचनाफलकावर लावण्यात यावे.

आपला विश्वासू,

स्वा/-

कुलसचिव

Syllabus Subject wise (2nd Year)